आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

७ जून २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय नेतेपदी नरेंद्र मोदी यांची निवड, रविवारी संध्याकाळी राष्ट्रपती भवनात प्रधानमंत्री म्हणून शपथविधी

- रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढाव्यात व्याजदर जैसे-थे, चालू आर्थिक वर्षासाठी विकास दराचा अंदाज वाढवून  ७ पूर्णांक २ दशांश टक्के

- लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या दिवशी झालेल्या घसरगुंडीची शेअर बाजारातून भरपाई, सेन्सेक्स आणि निफ्टी विक्रमी पातळीवर

**आणि**

- मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव १५ ते २१ जून दरम्यान /मुंबई, पुण्यासह देशभरात ५ ठिकाणी चित्रपटांचं प्रदर्शन

**<><><><><>**

भाजपचे ज्येष्ठ नेते, नरेंद्र मोदी येत्या रविवारी, ९ जून रोजी सलग तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नरेंद्र मोदी यांना आणि त्यांच्या नवीन मंत्रिमंडळाला शपथ देतील. राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ही माहिती दिली.

**होल्ड - प्रधानमंत्री**

**<><><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला दिलेल्या राज्यघटनेतली मूल्यं जपण्यासाठी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समर्पित असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गरीब परिस्थितीत आणि मागासलेल्या

कु◌ुटुंबात जन्मलेल्या आपल्यासारख्या व्यक्तीला देशाची सेवा करण्याची संधी मिळाली, ती फक्त राज्यघटनेमुळेच, असं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात नमूद केलं आहे. भारताची राज्यघटना कोट्यवधी नागरिकांना आशा, ताकद आणि प्रतिष्ठा देते, असंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाचे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची आज निवड झाली. रालोआच्या नवनिर्वाचित खासदारांची बैठक आज नवी दिल्लीत संसद भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात झाली. संरक्षण मंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंग यांनी नरेंद्र मोदी यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. मोदी यांच्या नेतृत्वात भारताने विलक्षण प्रगती केली असून यापुढेही ही वाटचाल यशस्वी होण्याकरता नरेंद्र मोदी ह्यांचंच नेतृत्व योग्य राहील असं ते म्हणाले. अमित शहा, नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह देशभरातल्या विविध नेत्यांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नेतेपदी निवड झाल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भाजपचे वरिष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांची भेट घेऊन त्यांचा आशीर्वाद घेतला. प्रधानमंत्र्यांनी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचीही त्यांच्या नवी दिल्ली इथल्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

दरम्यान, वंदे भारत रेल्वेच्या चालकांनाही या शपथविधी सोहळ्याचं आमंत्रण देण्यात आलं आहे. यात मध्य रेल्वेच्या सुरेखा यादव आणि पश्चिम रेल्वेच्या प्रीती साहू यांचाही समावेश आहे.

**<><><><><>**

राज्य विधानपरिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं माघार घेतली आहे. मनसेतर्फे अभिजीत पानसे यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र आज, मुदतीच्या शेवटच्या दिवशी त्यांनी अर्ज न भरण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीसाठी शिवसेनेचे संजय मोरे आणि भाजपाचे निरंजन डावखरे रिंगणात आहेत. डावखरे यांनी आज अर्ज भरला. दरम्यान,  राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे अमित सरैय्या यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी भाजपाचे उमेदवार किरण शेलार यांनीही आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<><><><><>**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाला पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. मनोज जरांगे उद्यापासून पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं आमरण उपोषणाला बसणार होते. त्याविरुद्ध चार दिवसांपूर्वी आंतरवाली सराटीच्या उपसरपंचांसह ७० जणांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिलं होतं.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज जाहीर केलेल्या द्वैमासिक पतधोरणाच्या आढाव्यात सलग आठव्यांदा व्याजदर जैसे-थे ठेवले. त्यामुळं कर्ज आणि ठेवींवरचे व्याजदर सध्यातरी बदलणार नाहीत. महागाईचा दर आणि विकास दरात समतोल साधला जात असल्याचं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी पतधोरण जाहीर करताना सांगितलं. यंदाचा मान्सून सामान्य राहील, या अपेक्षेनं वाढती महागाई आटोक्यात ठेवण्याचा पतधोरण समितीचा प्रयत्न राहील असंही ते म्हणाले.

चालू आर्थिक वर्षातल्या पहिल्या पतधोरणात रिझर्व्ह बँकेनं देशाचा विकास दर ७ टक्के राहील, असा अंदाज वर्तवला होता. त्यात यावेळी सुधारणा करुन आर्थिक विकास दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे.

<><><><><>

संभाव्य डिजिटल घोटाळ्यांचा अंदाज घेण्यासाठी रिझर्व्ह बँक डिजिटल पेमेंट इंटिलिजन्स प्लॅटफॉर्मची स्थापना करण्याच्या विचारात आहे. यात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन घोटाळ्यांचा अंदाज घेतला जाईल आणि ते टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांना सतर्क केलं जाईल. यामुळं सर्वसामान्यांचं नुकसान टाळायला मदत होणार आहे. यासाठी नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे माजी व्यवस्थापकीय संचालक ए. पी. होता यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचं स्थापना बँकेनं केली आहे. २ महिन्यात ही समिती अहवाल सादर करेल. बँकिंग उद्योगात नवनवीन तंत्रज्ञान आणण्यासाठी रिझर्व्ह बँक जागतिक हॅकेथॉनचं आयोजन करते. यंदा या स्पर्धेसाठी ‘शून्य वित्तीय घोटाळे’ आणि ‘दिव्यांग स्नेही बँकींग’ या दोन विषयांवर आधारित नवोन्मेष सादर करायचे आहेत.

युपीआय लाइटच्या माध्यमातून छोट्या रकमेचे व्यवहार इंटरनेट नसतानाही करता येतात. आता या खात्यातली रक्कम ठराविक मर्यादेच्या खाली गेली तर ऑटोमॅटिक पद्धतीनं रकमेचा भरणा करण्याची सुविधा रिझर्व बँक उपलब्ध करुन देणार आहे. तसंच फास्टॅग आणि नॅशनल कॉमल मोबिलिटी कार्डमध्येही ठराविक मर्यादेपेक्षा कमी रक्कम झाली, तर आपोआप रिचार्ज करण्याची सोय बँक उपलब्ध करुन देणार आहे.

<><><><><>

मतमोजणीच्या दिवशी झालेली भरमसाठ घसरगुंडी भरुन काढत देशातल्या शेअर बाजारांनी आज पुन्हा विक्रमी पातळी गाठली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून झालेला सरकार स्थापनेचा दावा, रिझर्व्ह बँकेचा पतधोरण आढावा यासारख्या कारणांमुळं देशातल्या शेअर बाजारात आज तेजी होती. अवघ्या ३ सत्रांमध्ये सेन्सेक्सनं साडे ४ हजार अंकांहून अधिक तेजी कमावली. एवढ्या कमी कालावधीत एवढी मोठी तेजी नोंदवण्याचाही हा विक्रम आहे. दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार ६१९ अंकांनी वधारून ७६ हजार ६९३ अंकांवर बंद झाला. निफ्टी ४६९ अंकांची तेजी नोंदवून २३ हजार २९० अंकांवर स्थिरावला. दोन्ही निर्देशांकांची ही ऐतिहासिक उच्चांकी पातळी आहे. बँक निफ्टी मात्र त्याच्या विक्रमी पातळीपासून अजून दूर आहे.

**<><><><><>**

अठरावा MIFF अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव येत्या १५ ते २१ जून दरम्यान होणार आहे. या महोत्सवात ५९ देशांचे ३१४ चित्रपट प्रदर्शित केले जातील. "अमृतकाळातला भारत" ही, या महोत्सवाची विशेष संकल्पना आहे, अशी माहिती माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी दिली. नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**व्हाइस कास्ट**

*मुख्य चित्रपट महोत्सव मुंबईत होणार असला तरी पुण्यासह दिल्ली, चेन्नई, आणि कोलकातामध्ये चित्रपटांचं प्रदर्शन केलं जाईल. पंधरा जूनला मुंबई, दिल्ली, कोलकाता, पुणे आणि चेन्नई इथं "बिली अँड मॉली, अँड ऑटर लव्ह स्टोरी" या चित्रपटानं महोत्सवाची सुरुवात होईल. या महोत्सवात जपान, रशियन, बेलारूस,*

*इराण, इटली, व्हिएतनाम आणि माली या देशांचे एकूण सतरा चित्रपट दाखवले जातील. यावर्षीच्या महोत्सवात स्पर्धा विभागासाठी ३८ देशांमधून आलेल्या ६५ भाषांमधल्या १ हजार १८ चित्रपटांच्या एवढ्या विक्रमी संख्येनं प्रवेशिका आल्या होत्या. यावर्षी अतिशय उच्च दर्जाचं चित्रपट सादरीकरण प्राप्त झाल्यानं निवड करणं कठीण झालं, असं मत परीक्षक समितीनं व्यक्त केलं आहे. चित्रपटांशिवाय या महोत्सवात संतोष सिवन, ऑड्रिअस स्टोनीस, केतन मेहता, रिची मेहता, यासारख्या अनेक दिग्गजांचे परिसंवाद होणार आहेत.*

**<><><><><>**

येत्या ९ ते ११ जून दरम्यान कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागात मान्सूनची चांगली प्रगती होईल असा अंदाज असून, हवामान विभागानं या ठिकाणी मुसळधार पावसाचा ऑरेंज आणि येलो अलर्ट जारी केला आहे.

९ जून रोजी कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग, १० जूनला कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी, तर ११ जून रोजी कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि सातारा या जिल्ह्यांमध्ये जोरदार ते अती-जोरदार पावसाची शक्यता असून, हवामान विभागानं या ठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**//<><><><><>//**